महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मादाम माका मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुख्य इमारत, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
ईमेल- doj1.rfd@maharashtra.gov.in

---

**क्रमांक : जमीन-२०२४/प्र.क्र.३१/ज-१** **दिनांक : ०१ मार्च,२०२४**

**प्रति,**

**जिल्हाधिकारी (सर्व)**

**विषयः- भोगवटादार वर्ग-२ चा धारणाधिकार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणेबाबत शासन अधिसूचनेतील तरतुदीनुसार विहीत कालमर्यादेत कारवाई करणेबाबत...**

**संदर्भ**:- १) शासन अधिसूचना क्र.जमीन-२०१८/प्र.क्र.९०/ज-१,दि. ०८/०३/२०१९
२) शासन अधिसूचना क्र. जमीन-२०२२/प्र.क्र.१७०/ज-१,दि.२७/०३/२०२३
३) शासनाचे समक्रमांकाचे दि. २१.०२.२०२४ रोजीचे पत्र.

"महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम, २०१९" हे संदर्भ क्र. १ येथील दि. ०८ मार्च, २०१९ च्या अधिसूचने अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. उपरोक्त अधिसूचनेतील तरतुदीनुसार भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनीचा धारणाधिकार भोगवटादार वर्ग-१ मध्ये सवलतीच्या दराने रुपांतरीत करण्याचा कालावधी हा अधिसूचनेच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंतचा होता. तसेच, संदर्भ क्र-२ येथे नमूद दि. २७ मार्च,२०२३ च्या अधिसूचने अन्वये सवलतीच्या दराने धारणाधिकार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याचा कालावधी हा ३ वर्षांच्या ऐवजी ५ वर्ष करण्यात आलेला आहे. तसेच, नवीन परंतुक देखील समाविष्ट करण्यात आलेले आहे.

**०२.** दि. २७ मार्च, २०२३ च्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार सवलतीच्या दराने भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनीचे रुपांतर भोगवटादार वर्ग-१ मध्ये करण्याबाबतचा कालावधी हा दि. ०७ मार्च, २०२४ रोजी संपुष्टात येत आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना क्र.३ च्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदर सूचना रद्द करून आता पुढीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत.

**०३.** ज्या व्यक्ती/संस्था यांनी दि.०७ मार्च, २०२४ पूर्वी अर्ज केला असेल व ज्यांना सक्षम प्राधिकाऱ्यांनी अधिमूल्यांची रक्कम भरण्याबाबतचे पत्र दि.१५.०२.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी दिले असेल, त्यांनी दि.०७.०३.२०२४ पावेतो अधिमूल्याची रक्कम भरल्यास, त्यांना सवलतीच्या दराचा लाभ मिळेल. विहीत मुदतीत रक्कम न भरल्यास अर्जदारास सवलतीच्या दराचा लाभ मिळणार नाही.

**०४.** तसेच, ज्या व्यक्ती/संस्था यांनी दि.०७ मार्च, २०२४ पूर्वी अर्ज केला असेल व ज्यांना सक्षम प्राधिकाऱ्यांनी अधिमूल्यांची रक्कम भरण्याबाबतचे पत्र दि. १६ फेब्रुवारी, २०२४ रोजी किंवा त्यांनतर दिले असेल

त्यांनी पत्र मिळाल्यापासून २१ दिवसांच्या आत सदर रक्कम भरल्यास त्यांना सवलतीच्या दराचा लाभ मिळेल. विहीत मुदतीत रक्कम न भरल्यास अर्जदारास सवलतीच्या दराचा लाभ मिळणार नाही.

**०५.** दि. ०७ मार्च, २०२४ नंतर अर्ज करणाऱ्या अर्जदारांना सवलतीच्या दराचा लाभ मिळणार नाही.

**०६.** दिनांक ०७ मार्च, २०२४ च्या आत सक्षम प्राधिकाऱ्याकडे प्राप्त प्रकरणांचा निपटारा कोणत्याही परिस्थितीत पुढील ३ महिन्याच्या कालावधीत (म्हणजेच दि.०७ जून, २०२४) पर्यंत करणे आवश्यक राहील.

उपरोक्त बाब सर्व हितसंबंधितांच्या निदर्शनास आणावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(धनंजय निकम)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) ज- समूहातील सर्व सह सचिव / उप सचिव
२) विभागीय आयुक्त (सर्व)
३) निवड नस्ती ज-१